# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई


५ वा मजला, एमएमटीसी हाऊस, प्लॉट नं. सी २२, ब्लॉक ई , वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई- ४०० ०५१ .

संकेतस्थळ– www.mahabocw.in
दुरध्वनी क्र. ०२२-२६५७२६३१/३२
ई-मेल- bocwwboardmaha@gmail.com


जा.क्र. ६३५ /२०२४ दिनांक :- 21 MAR 2025

आरोग्य-२०२४/प्र.क्र.०९/योजना-०६

**प्रति,**

**१. अप्पर कामगार आयुक्त**
**कोकण विभाग/पुणे/नागपूर**

**२. कामगार उप आयुक्त,**
**अमरावती /नाशिक /छ.संभाजीनगर**

**विषय :-** **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांचेवर अवलंबित कुटुंबिय यांचेकरीता BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रुग्णालय उभारणीव्दारे तपासणी ते उपचार (Test to Treat) आरोग्य योजनेबाबतची कार्यपध्दती (SOP)**

०१ शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.इबाका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७, दि.०७.०८.२०२३

०२ शासन शुध्दीपत्रक उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.इबाका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७, दि.०९.०१.२०२४

०३ मंडळाचे कार्यारंभ आदेश जा.क्र.२८६१/ आरोग्य-२०२४/प्र.क्र.०९/ योजना-०६/२०२४ दि.२१.०२.२०२४.

०४ महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.०२.०७.२०२४ रोजीच्या बैठकीतील संपन्न ठराव क्र. ६० (३५)

०५ मंडळाचे पत्र क्र.आरोग्य-२०२४/प्र.क्र.३५/योजना-०६/६१८, दि.१०.०७.२०२४

०६ उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र. इबांका-०५२३/प्र.क्र.७७ (भाग-१)/कामगार-७ दि.१०.०७.२०२४

०७ शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा ,कामगार व खनिकर्म विभाग क्र.इबाका-२०२३/प्र.क्र.७७ (भाग-१)/कामगार-७, दि.१२.०७.२०२४

०८ मंडळाचे कार्यारंभ आदेश जा.क्र.७४१/ आरोग्य-२०२४/प्र.क्र.३५/योजना-०६/२०२४ दि.२४.०७.२०२४.

०९ मंडळाचे कार्यारंभ आदेश जा.क्र.७४२/ आरोग्य-२०२४/प्र.क्र.०९/योजना-०६/२०२४ दि.२४.०७.२०२४.

१०. मंडळाचे पत्र क्र.आरोग्य-२०२४/प्र.क्र.३५/योजना-६ /११९७/२०२४, दि.३०.०९.२०२४

११. शासन शुध्दीपत्रक उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग क्र.इबाका-०५२३/प्र.क्र.७७ (भाग-१)/कामगार-७, दि.०१.१०.२०२४

१२. मंडळाचे पत्र क्र. आरोग्य-२०२४/प्र.क्र.३५/योजना-०६/१२७०/२०२४, दि.०७.१०.२०२४

उपरोक्त संदर्भाधिन (०१) ते (१२) अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांचेवर अवलंबित कुटुंबिय यांचेकरीता "**तपासणी ते उपचार आरोग्य योजना**" लागू करण्यात आलेली आहेत. तसेच मंडळामार्फत BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रुग्णालय उभारणीव्दारेदेखील सदर योजना राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने मे. एच.एल.एल. लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) व मे. एच.एस.सी.सी. (इंडिया) लि. (भारत सरकार उद्योग) यांच्यासोबत करारनामा करण्यात आला असून कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

०२. सबब, सदर योजनेबाबतची सविस्तर कार्यपध्दती (SOP) पुढील कार्यवाहीकरीता सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर कार्यपध्दतीबाबत आपल्या स्तरावरून सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात यावे.

**सोबत :- कार्यपध्दती (SOP)**

(विवेक कुंभार)

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामागार कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार व कुटुंबिय यांचेकरीता BOMT (Build Operate Manage Transfer ) या तत्वावर रुग्णालय उभारणीव्दारे तपासणी ते उपचार (Test to Treat) आरोग्य योजनेबाबतची कार्यपध्दती (SOP)**

१. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि.०७.०८.२०२३ रोजीचा शासन निर्णय व दि.०९.०१.२०२४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ अंतर्गत नोंदित (सक्रीय) बांधकाम कामगारांकरीता " तपासणी ते उपचार आरोग्य योजना " राबवण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

२. सदर योजने अंतर्गत सर्व नोंदित (सक्रीय ) बांधकाम कामगार तसेच त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व १८ वर्षापर्यंत प्रथम २ अपत्ये हे लाभार्थी आहेत. त्यानुसार मंडळ आणि मे. एचएलएल लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांचेमध्ये दि.२१.०२.२०२४ रोजी करारनामा करण्यात आला आहे सदर कराराचा कालावधी दि. २१.०२.२०२४ पासून ५ वर्ष इतका आहे. मंडळाकडून मे. एच.एल.एल लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांना दि. २१.०२.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. मंडळ ठराव क्रमांक (६०) (३५) / २०२४ अन्वये BOMT (Build Operate Manage Transfer ) या तत्वावर मे. एचएससीसी (इंडिया) लि. (भारत सरकार उद्योग) यांचे मार्फत आरोग्य तपासणी केंद्र व हॉस्पिटल उभारणी करण्याचा ठराव पारीत करण्यात आला आहे.

३. त्या अनुषंगाने मंडळाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावास शासन निर्णय दि.१२.०७.२०२४ अन्वये मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगार व कुटुंबिय यांचेकरीता BOMT (Build Operate Manage Transfer ) या तत्वावर रुग्णालय उभारणीव्दारे तपासणी ते उपचार आरोग्य योजना राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार मंडळ आणि मे. एचएससीसी (इंडिया) लि.) यांचेमध्ये दि.१८.०७.२०२४ रोजी करारनामा करण्यात आला आहे मंडळाकडून मे. एचएससीसी (इंडिया) लि.) यांना दि.२४.०७.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

४. सदर योजने अंतर्गत बांधकाम कामगारास सार्वजनिक आरोग्य विभागाची 'महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अथवा कामगार विभागाअंतर्गत मंडळाची "तपासणी ते उपचार आरोग्य योजना", या दोन योजनापैकी कोणतीही एक योजना निवडण्याचा विकल्प देण्यात आला आहे. एकदा विकल्प निवडल्यास बांधकाम कामगारास त्याच योजनेअंतर्गत लाभ घेणे बंधनकारक ठरेल. या संबंधीचे बांधकाम कामगाराकडून **प्रपत्र ०१- सामान्य संमतीपत्र** भरून घेणे बंधनकारक आहे.

सदर योजना पुढील टप्प्यात राबविण्यात येत आहे,

(अ) प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी
(ब) प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी
(क) वैद्यकीय उपचार
(ड) रुग्णालयातील उपचार

उपरोक्त नमुद (अ) ते (ड) या चार टप्प्यांच्या अमंलबजावणीकरीता मे. एचएलएल लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) आणि मे. एचएससीसी (इंडिया) लि. लाइफकेअर प्रोजेक्ट (भारत सरकार उद्योग) या दोन संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(इ) BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रुग्णालय उभारणी

सदर (इ) या टप्प्याच्या अमंलबजावणीकरीता मे. एचएससीसी (इंडिया) लि. लाइफकेअर प्रोजेक्ट (भारत सरकार उद्योग) या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर योजनेच्या टप्प्यांच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती (SOP) खालीलप्रमाणे राहील:-

(अ) **प्राथमिक आरोग्य तपासणी** -

१) प्राथमिक आरोग्य तपासणी टप्यांतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांच्या खालील कुटुंबियांना योजनेचे लाभार्थी म्हणण्यात येईल. यासाठी शिधापत्रिका (रेशन कार्ड) पुरावा ग्राह्य धरण्यात येईल.

**(अ-१)** सदर योजनेअंतर्गत सर्व अविवाहित व विवाहित पुरूष नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील आई , वडिल , पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये, ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

**(अ-२)** सदर योजनेअंतर्गत सर्व अविवाहित महिला नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील आई व वडिल ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

**(अ-३)** सदर योजनेअंतर्गत सर्व विवाहित महिला नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील सासु ,सासरे, पती व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये, ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

**(अ-४)** मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील. तथापि, संबंधित बांधकाम कामागारांची १० वर्षाखालील २ अपत्ये अपघात अथवा इतर आजारपणाकरीता रूग्णालय भरती व औषधोपचारास पात्र राहतील मात्र त्यांना प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी अनुज्ञेय राहणार नाही.

२) नियुक्त सेवापुरवठादार संस्थेकडून आयोजित प्राथमिक आरोग्य तपासणी शिबीरामध्ये अथवा बांधकाम कामगारांच्या कामाच्या ठिकाणी/घरोघरी जाऊन देण्यात येत असलेल्या स्थळ भेटीव्दारे कार्यारंभ आदेशामध्ये नमूद केलेल्या २३ प्रकारच्या आरोग्य तपासणी चाचण्या नियुक्त संस्थेकडून करण्यात येतील.

३) प्राथमिक आरोग्य तपासणीवेळी प्रत्येक बांधकाम कामगारांचा नोंदणी क्र. हा त्याचा Beneficiary ID असेल त्यास कुटुंबातील सदस्यांची माहिती सलंग्न करण्यात येईल.

४) सर्व लाभार्थ्यांना त्यांचा प्राथमिक आरोग्य तपासणी चा अहवाल -

a. संबंधित बांधकाम कामगार व त्याच्या कुटुंबातील लाभार्थ्यांचा अहवाल बांधकाम कामगाराने मंडळाकडे नोंद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर SMS द्वारे पाठवण्यात

आलेल्या लिंक https://mbocwb.myhindlab.com/Construction Workers / Beneficiary search aspx. वरही उपलब्ध होईल.

b. तसेच बांधकाम कामगाराने मंडळाकडे नोंदीत भ्रमणध्वनी क्रमांकाशी संबंधित Whats App या समाज माध्यमावरही उपलब्ध करून देण्यात येईल.

c. संबंधित बांधकाम कामगारांना आरोग्य तपासणीच्या वेळी हेल्थकार्ड उपलब्ध करून देण्यात येईल त्यावरील QR Code व्दारे सुद्धा तपासणी अहवाल उपलब्ध होईल. (नमुना प्रपत्र -०२)

d. तसेच संबंधित जिल्हा/तालुका कामगार सुविधा केंद्रामध्ये सुद्धा तपासणी अहवाल उपलब्ध होईल.

e. संबंधीत लाभार्थ्यास त्याचा तपासणी अहवाल स्क्रिनिंग टू ट्रिटमेंट अप्लीकेशन डाऊनलोड करून त्याव्दारेही उपलब्ध होईल. त्याकरीता संबंधित लाभार्थ्याने त्याचा नोंदणी क्र. व दुरध्वनी क्र. नमुद करून अप्लीकेशनमध्ये लॉग इन करावे तदनंतर त्याच्या दुरध्वनी क्रमांकावर आलेला ओटीपी नमूद करून अप्लीकेशनमधील माहिती त्यास पाहता येईल. सदर अप्लीकेशनमध्ये बांधकाम कामगाराच्या व त्याच्या अवलंबितांची माहिती उपलब्ध होईल. तसेच अवलंबितांची माहिती देखील समाविष्ट करण्याची सोय उपलब्ध आहे.

f. **सदर अप्लीकेशनमध्ये लाभार्थ्यास खालील माहिती उपलब्ध असेल.**

i) प्राथमिक आरोग्य तपासणी अहवाल

ii) प्रगत पुष्टीकरण चाचणीचे अहवाल

iii) डॉक्टरांनी दिलेले Prescription

iv) नजीकच्या रुग्णालयांची व स्थिर आरोग्य तपासणी केद्रांची यादी

v) आपतकालीन वैद्यकीय सहाय्याकरीता डॉक्टरांना संपर्क करण्याची सुविधा

vi) वैद्यकीय सहाय्यासाठी आरोग्य साथीला संपर्क करण्याची सुविधा

५) प्राथमिक आरोग्य तपासणी झालेल्या सर्व लाभार्थ्यांचे तपासणी अहवालाचे उपरोक्त नमूद इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वितरण झाल्यानंतर प्रति लाभार्थी रू.३९००/- या प्रमाणे प्रत्येक महिन्याची देयके, जिल्हा कार्यालयांकडे नियुक्त संस्थेमार्फत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात येतील.

६) जिल्हा कार्यालयांना प्राथमिक आरोग्य तपासणीची देयके नियुक्त संस्थेव्दारे मंडळाच्या आरोग्य तपासणी पोर्टलवर Log in मध्ये उपलब्ध करून देण्यात येतील. नियुक्त संस्थेने सादर केलेल्या देयकांमध्ये प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी चे दर हे २१.०२.२०२४ च्या कार्यारंभ आदेशामध्ये प्रमाणित केलेल्यानुसार आहेत का? याची पडताळणी करून देयक अदायगीस मंडळास शिफारस करण्याची आहे. देयके ऑनलाइन Approve करून, **परिशिष्ट** -०१ ची हार्ड कॉपी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रमाणित करून देणे आवश्यक आहे.

७) नियुक्त संस्थेने तपासणी ते उपचार योजनेच्या वेबसाइट/पोर्टल https://www.test2treat.in/ वर खालील माहिती अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे.

a. स्थिर आरोग्य तपासणी केंद्राची तालुकानिहाय यादी

b. सूचीबद्ध केलेल्या रुग्णालयांची जिल्हानिहाय यादी

c. फिरते वैद्यकीय कक्षाचे (MMU) जिल्हानिहाय Nodal Center च्या भेटीचे वेळापत्रक

८) नियुक्त संस्था २३ आरोग्य तपासणी चाचण्यांकरीता संबंधीत लाभर्थ्याकडून कोणतेही शुल्क आकारणार नाही. सदर २३ चाचण्या लाभार्थ्यांकरीता नि:शुल्क असतील.

९) ज्या लाभार्थ्याचे तपासणी अहवाल सामान्य (Normal) येतील त्या लाभार्थ्याची पुढील आरोग्य उपचार कार्यवाही बंद करण्यात येईल, परंतू असे लाभार्थी पुढे आवश्यकता लागल्यास या योजनेतील उपचारांच्या कार्यवाहीचा लाभ कधीही घेऊ शकतात.

१०) प्राथमिक आरोग्य तपासणीनंतर आवश्यकतेनुसार लाभार्थ्यांचे डॉक्टरासोबत Tele-Consultation करण्यात येईल. यालाच Post-Health Camp असे संबोधण्यात येईल.

११) प्राथमिक तपासणी अहवाल असामान्य (Abnormal) असलेल्या लाभार्थ्यांना, तज्ञ डॉक्टरांकडून सर्वप्रथम टेली-कन्सल्टेशन केले जाईल यामध्ये आवश्यकतेनुसार प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचण्या अथवा काही प्राथमिक आरोग्य तपासणी चाचण्या परत करण्याचा सल्ला दिला जाईल. तसेच आवश्यकतेनुसार औषधांचे प्रिस्क्रिप्शन (Prescription) सुद्धा दिले जाईल व त्यानुसार औषधांचा पुरवठा करण्यात येईल.

१२) नियुक्त संस्थेव्दारे उपलब्ध केलेल्या योजनेच्या टोल फ्री क्र. १-८००-२६६-६६६-६६६ येथे लाभार्थ्याने फोन केल्यानंतर आवश्यकता असल्यास तज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन केले जाईल. यावेळी सुद्धा आवश्यकतेनुसार प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचण्या अथवा काही प्राथमिक आरोग्य तपासणी चाचण्या परत करण्याचा सल्ला दिला जाईल. तसेच आवश्यकतेनुसार औषधांचे प्रिस्क्रिप्शन (Prescription) सुद्धा दिले जाईल व त्यानुसार औषधांचा पुरवठा करण्यात येईल.

१३) नियुक्त संस्थेमार्फत सूचीबद्ध केलेली स्थिर आरोग्य तपासणी केंद्र, फिरते वैद्यकीय कक्ष (MMU) व रुग्णालये येथे योजनेचे लाभार्थी प्रत्यक्ष उपस्थित राहून बाह्यरुग्ण उपचार (OPD) घेऊ शकतात. बाह्यरुग्ण उपचार (OPD) पद्धती ही पूर्णपणे नि:शुल्क आहे व त्यासंबंधी कोणतीही देयके नियुक्त संस्थेमार्फत मंडळास सादर होणार नाहीत.

१४) नियुक्त संस्थेमार्फत सूचीबद्ध केलेल्या स्थिर आरोग्य तपासणी केंद्र व फिरते वैद्यकीय कक्ष (MMU) येथे प्रत्यक्ष उपस्थित राहिलेल्या लाभार्थ्यांना सुद्धा तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनानंतर आवश्यकतेनुसार प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचण्या अथवा काही प्राथमिक आरोग्य तपासणी चाचण्या परत करण्याचा सल्ला दिला जाईल. तसेच आवश्यकतेनुसार औषधांचे प्रिस्क्रिप्शन (Prescription) सुद्धा दिले जाईल व त्यानुसार औषधांचा पुरवठा सुद्धा करण्यात येईल.

१५) ज्या लाभार्थ्यांना प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी करण्यास तज्ञ डॉक्टरांनी सांगितले आहे अशा लाभार्थ्यांना नियुक्त संस्थेच्या जिल्हास्तरीय आरोग्यसाथी यांच्या मार्फत समन्वय साधून प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी साठी रक्ताचे अथवा लघवीचे नमुने (Sample Collection) केले जाईल. प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी ही जर Radiology/X-ray संबधित असेल तर जिल्हास्तरीय आरोग्यसाथी यांच्या मार्फत समन्वय साधून लाभार्थ्यांना Radiology/X-ray प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी केंद्रावर येण्यासाठी मार्गदर्शन केले जाईल.

१६) प्राथमिक आरोग्य तपासणी चाचण्या दुबार केल्यास, नियुक्त संस्थेकडून एकवेळेस विनाशुल्क दुबार चाचणी करण्यात येईल.

(ब) **प्रगत पुष्टीकरण आरोग्य तपासणी (OPD) -**

१) **प्रगत पुष्टीकरण आरोग्य तपासणी** करण्याअगोदर नियुक्त संस्थेने लाभार्थ्यांकडून या संबंधीचे **प्रपत्र ३** - प्रगत पुष्टीकरण आरोग्य तपासणी चाचणी करण्यासाठीचे स्वयं-घोषणापत्र, घेणे बंधनकारक आहे. प्रगत पुष्टीकरण चाचणी व रूग्णालय भरती याची एकत्रीत मर्यादा रू. २.०० लक्ष आहे.

२) नियुक्त संस्थेमार्फत क्षेत्रीय कार्यालयांकडे दर महिन्याला ज्या लाभार्थ्यांची प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी करून तपासणीचा अहवाल लाभार्थ्याला इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (SMS अथवा Whats App/ स्क्रिनिंग टू ट्रिटमेंट अप्लीकेशन द्वारे) वितरित झालेला आहे, अशा प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीची देयके ऑनलाइन पोर्टलवर क्षेत्रीय कार्यालयांच्या Log in मध्ये उपलब्ध करून देण्यात येतील.

३) संबंधीत लाभार्थ्यास त्याचा तपासणी अहवाल **'स्क्रिनिंग टू ट्रिटमेंट अप्लीकेशन'** डाऊनलोड करून त्याव्दारेही उपलब्ध होईल. त्याकरीता संबंधित लाभार्थ्याने त्याचा नोंदणी क्र. व दुरध्वनी क्र. नमुद करून अप्लीकेशनमध्ये लॉग इन करावे तदनंतर त्याच्या दुरध्वनी क्रमांकावर आलेला ओटीपी नमूद करून अप्लीकेशनमधील माहिती त्यास पाहता येईल. सदर अप्लीकेशनमध्ये बांधकाम कामगाराच्या व त्याच्या अवलंबितांची माहिती उपलब्ध होईल. तसेच अवलंबितांची माहिती देखील समाविष्ट करण्याची सोय उपलब्ध आहे.

४) सदर अप्लीकेशनमध्ये लाभार्थ्यास खालील माहिती उपलब्ध असेल.

- vii) प्राथमिक आरोग्य तपासणी अहवाल
- viii) प्रगत पुष्टीकरण चाचणीचे अहवाल
- ix) डॉक्टरांनी दिलेले Prescription
- x) नजीकच्या रुग्णालयांची व स्थिर आरोग्य तपासणी केद्रांची यादी
- xi) आपतकालीन वैद्यकीय सहाय्याकरीता डॉक्टरांना संपर्क करण्याची सुविधा
- xii) वैद्यकीय सहाय्यासाठी आरोग्य साथीला संपर्क करण्याची सुविधा

५) नियुक्त संस्थेने सादर केलेल्या देयकांमध्ये प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी चे दर हे २१.०२.२०२४ च्या कार्यारंभ आदेशामध्ये प्रमाणित केलेल्यानुसार आहेत का? याची पडताळणी करून देयक अदायगीस मंडळास शिफारस करावयाची आहे. सदर चाचणीचे सुधारीत दर क्षेत्रीय कार्यालयास वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येतील. देयके ऑनलाइन Approve करून, **परिशिष्ट** - ०२ ची हार्ड कॉपी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रमाणित करून देणे आवश्यक आहे. सदर

(क) **औषोधोपचार (OPD) -**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

१) या टप्प्याअंतर्गत प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणीमध्ये किंवा प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणीमध्ये (Advanced Confirmatory Test) असामान्य अहवाल (Abnormal Report) असलेल्या लाभार्थ्यांस आवश्यकतेनुसार लाभार्थ्याच्या सहमतीने, वेळोवेळी तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधांचे prescription दिले जाईल व त्या औषधांचे वितरण नियुक्त संस्थेमार्फत त्यांचे तालुक्यातील स्थिर आरोग्य तपासणी केंद्रे किंवा फिरते वैद्यकीय कक्ष (MMU) किंवा नियुक्त संस्थेमार्फत औषधी घरपोच वितरणासाठी उपलब्ध केलेल्या तत्सम मनुष्यबळातर्फे केले जाईल.

२) औषधे लाभार्थ्यास देताना त्याची हस्तपोच व ऑनलाईन फोटो संस्थेमार्फत घेण्यात येऊन संगणक प्रणालीवर अपलोड करण्यात येणार आहे. औषधे लाभार्थ्यास देतानां नियुक्त संस्थेने लाभार्थ्यांकडून या संबंधीचे **प्रपत्र ४ - स्वयं घोषणापत्र** (मोफत औषधे मिळाल्यानंतर), घेणे बंधनकारक आहे.

३) प्रति लाभार्थी प्रति वर्षी रू. ५०००/- च्या कमाल मर्यादेतील औषधोपचाराचा लाभ लाभार्थ्यांना देय राहणार आहे. नियुक्त संस्थेने सादर केलेल्या देयकांमध्ये औषधांचे दर हे २१.०२.२०२४ च्या कार्यारंभ आदेशामध्ये प्रमाणित केलेल्यानुसार आहेत कां? याची पडताळणी करून अदायगीस मंडळास शिफारस क्षेत्रीय कार्यालयांनी करणे आवश्यक आहे.

४) नियुक्त संस्थेमार्फत क्षेत्रीय कार्यालयांकडे दर महिन्याला ज्या लाभार्थ्यांना रु. ५०००/- च्या कमाल मर्यादेतील औषधे देण्यात आली आहेत, त्यांची देयके ऑनलाइन पोर्टलवर क्षेत्रीय कार्यालयांच्या Log in मध्ये उपलब्ध करून देण्यात येतील. देयके ऑनलाइन Approve करून, **परिशिष्ट -०३** ची हार्ड कॉपी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रमाणित करून देणे आवश्यक आहे.

### (ड) रूग्णालय भरती (IPD)-

१) या टप्प्याअंतर्गत उपचाराकरीता संबंधित लाभार्थी महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्हयातील सूचीबध्द रुग्णालयात भरती होऊ शकतो.

२) रुग्णालयातील IPD उपचारासंदर्भात खालील कागदपत्रे हे प्रत्येक रुग्णालयाने त्या संबंधित लाभार्थ्यासाठी भरणे, ऑनलाइन अपलोड करणे आवश्यक आहे. खालील मार्गदर्शक कागदपत्रांचे नमुने सोबत जोडण्यात आले आहेत.

a. Admission Form आणि Admission Notes
b. Daily Clinical Notes
c. IPD Treatment Chart
d. IPD medicines list with pharmacy bill
e. ICU Drug & Treatment Chart
f. History or report of Alcohol/ MLC/ FIR as per case-to-case basis
g. Implant stickers as per case-to-case basis
h. Discharge Summary/ Card

३) रुग्णालयात भरती/दाखल झाल्यावर लाभार्थ्याकडून सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील प्रपत्र-०५, संमती पत्र रुग्णालयातील अंतर्गत रुग्ण वैद्यकीय उपचार सुरु करण्यासाठी, आरोग्यसाथीमार्फत घेण्यात येइल.

४) लाभार्थी रूग्णालयात भरती झाल्यावर त्यास अनुज्ञेय खर्च रू. २.०० लक्षपेक्षा त्याचा खर्च अधिक होत असल्यास संबंधित लाभार्थी/ त्याला शक्य नसल्यास त्याच्या वतीने पती/पत्नी/आई/वडील/सासू/सासरे यांचेकडून संमती पत्र घेण्यात येईल. रू २.०० लक्षपेक्षा खर्च अधिक होत असल्यास अतिरिक्त रक्कमेस मान्यतेकरीता प्रस्ताव संस्थेमार्फत बांधकाम कामगार आरोग्य समितीस सादर करण्यात येईल. लाभार्थ्याकडून घेण्यात येणाऱ्या संमतीपत्रात बांधकाम कामगार आरोग्य समितीची मान्यता प्राप्त न झाल्यास सदर अतिरीक्त रक्कम संबंधित लाभार्थ्यामार्फत रूग्णालयास अदा करण्यात येईल. अशा आशयाचे संमतीपत्र **प्रपत्र-०६** (रुग्णालयातील अतिरिक्त खर्चाच्या रकमेचा भरणा करण्यासाठी) आरोग्यसाथी संबंधित लाभार्थ्याकडून अथवा त्याच्या नातेवाईकांकडून घेईल. आरोग्य समितीची मान्यता आल्यावर मंडळामार्फत नियुक्त संस्थेस अतिरीक्त रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यात येईल. व संस्थेमार्फत सदर रक्कम संबधित लाभार्थ्यास अदा करण्यात येईल.

५) एखादया रूग्णालयातून काही काळ उपचार घेतल्यावर जर दुसऱ्या रूग्णालयात अथवा दुसऱ्या जिल्हयातील रूग्णालयात रुग्णास भरती करावयाचे असल्यास दोन्ही जिल्हयाकरीता आंतररूग्ण कालावधीची दोन स्वतंत्र देयके संस्थेमार्फत ऑनलाइन पोर्टल वर सादर केली जातील व उपचाराच्या कालावधीनुसार संबंधित जिल्हयातील अधिकाऱ्यामार्फत देयके तपासून शिफारशीसह मंडळास सादर करण्यात येतील.

६) बांधकामाच्या ठिकाणी नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारास अपघात झाल्याचे अवगत झाल्यास नियुक्त संस्था उपलब्ध संसाधनांच्या मदतीने नजिकच्या सूचिबध्द रूग्णालयात लाभार्थ्यास दाखल करेल अशा तातडीच्या वेळी संबंधित लाभार्थ्याच्या सहमतीची आवश्यकता राहणार नाही. तसेच बांधकामाच्या ठिकाणाव्यतिरीक्त इतर ठिकाणी अपघात झाल्यासही सदर योजनेचे लाभ त्यास अनुज्ञेय राहतील. तसेच अशा या तातडीच्या वेळी, संबंधित लाभार्थ्याला सूचिबध्द नसलेल्या रूग्णालयात सुद्धा दाखल करण्याची मुभा नियुक्त संस्थेस आहे. अशा सूचिबध्द नसलेल्या रूग्णालयास लवकरात लवकर सूचिबध्द करून घेण्याची पूर्ण जबाबदारी ही नियुक्त संस्थेची असेल.

७) विशिष्ठ आजाराच्या प्रकरणी उपचाराचा खर्च रक्कम रु.२ लक्ष पेक्षा जास्त मात्र रु.७ लक्ष या कमाल मर्यादेत होणार असल्यास, संबंधित रूग्णालयाच्या वैद्यकीय प्रमुख यांची शिफारस तसेच जिल्हा कामगार सुविधा केंद्राचे प्रमुख- कामगार उप आयुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांच्या मान्यतेने व संबधित जिल्हयाच्या शासकीय रूग्णालयाचे अधिष्ठाता यांच्या शिफारशीने अशी प्रकरणे "बांधकाम कामगार आरोग्य समिती" कडे सादर करण्यात यावीत.

८) संस्थेने सदर योजनेअंतर्गत वैद्यकीय सेवा २४X७ देणे बंधनकारक राहील. तथापि, कागदपत्रांच्या कामकाजासाठी कार्यालयीन कामकाजाची व्याख्या ही शासकीय सुटयांव्यतिरीक्त सकाळी ९.४५ ते सांय ६.१५ अशी राहील.

९) ज्या लाभार्थ्यांची IPD रुग्णालयातील उपचार पद्धती पूर्ण होऊन रुग्णालयातून discharge झाला आहे, अशाच लाभार्थ्यांची IPD ची देयके क्षेत्रीय कार्यालयांकडे सादर होतील.

१०) नियुक्त संस्थेमार्फत क्षेत्रीय कार्यालयांकडे दर महिन्याला IPD रुग्णालयातील उपचार पद्धतीचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची देयके ऑनलाइन पोर्टलवर क्षेत्रीय कार्यालयांच्या Log in मध्ये

उपलब्ध करून देण्यात येतील. देयके ऑनलाइन Approve करून, **परिशिष्ट - ४ आणि परिशिष्ट - ५** यांची हार्ड कॉपी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रमाणित करून देणे आवश्यक आहे.

११) संबंधित नियुक्त संस्थेतर्फे दरमहा खालील ४ वेगवेगळी देयके व त्यानुसार संबंधित ४ परिशिष्ट सादर केली जातील.

a. प्राथमिक आरोग्य तपासणीची देयके - **परिशिष्ट क्र.१ (रू.३९००/- प्रति लाभार्थी प्रमाणे)**
b. प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचणी व रूग्णालय भरती ची देयके - **परिशिष्ट क्र.२ (रू. २.०० लक्षच्या मर्यादेपर्यंत)**
c. औषधी दिल्याची देयके - **परिशिष्ट क्र. ३ (रू.५०००/- प्रति लाभार्थी प्रति वर्ष)**
d. रुग्णालय भरती करून उपचार केल्याची देयके - रु २ लक्ष ते रु ७ लक्ष च्या कमाल मर्यादेपर्यंत - **परिशिष्ट क्र.५**

१२) वरील नमूद केलेल्या सर्व देयकांबाबतची सर्व माहिती तपासणीकरीता नियुक्त संस्थेने समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System) तयार केली असून त्याव्दारे संबंधित जिल्हा प्रमुखांना Log In ID देण्यात येतील.

१३) क्षेत्रीय कार्यालयांकडून दर महिन्याला वरील देयके ऑनलाइन पोर्टलवर त्याची शहानिशा करून, Approve केल्यानंतर मंडळाला सादर केली जातील.

१४) मंडळास देयक सादर करतांना सर्व कागदपत्रे ही समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली मध्ये जतन करून ठेवण्याची जबाबदारी ही नियुक्त संस्थेची आहे व ही कागदपत्रे मंडळास कधीही ऑनलाइन verification साठी उपलब्ध असतील.

१५) मंडळास मासिक देयक प्राप्त झाल्यानंतर, प्राप्त देयकाची मंडळाच्या आरोग्य तपासणी पोर्टलवरील माहितीशी पडताळणी करुन देयक अदायगीसाठी देयक पडताळणी व शिफारस अहवाल सादर करणेत येईल व त्यानुसार देयक अदायगीची पुढील कार्यवाही करण्यात येईल. नियुक्त संस्थेने तयार केलेल्या संगणक प्रणालीचा (Dashboard) चा संपूर्ण Access मंडळास उपलब्ध करून देण्यात येईल.

१६) नियुक्त संस्थेबरोबर झालेल्या करारनाम्यानुसार, नियुक्त संस्थेच्या कामगिरीसाठी SLA पुढील तक्ता क्र. ०१ व तक्ता क्र. ०२ मध्ये दर्शविल्यानुसार लागू आहेत. नियुक्त संस्थेने समाधानकारक आणि दिलेल्या वेळेत उपचार पद्धतीचे काम न केल्यास दंड आकारण्याची तरतूद केलेली आहे. या सर्व SLA ची परीगणना ही समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System) येथे होईल. सदर कार्यपद्धती प्रकाशित झाल्या पासून ०३ महिन्यापर्यंतचा कालावधी हा या योजनेच्या सर्व तपासणी पद्धती आणि आवश्यक असलेल्या संसाधनांची संरचना कार्यपद्धतीनुसार सुरळीत करण्यासाठी आहे. सबब, योजना जाहीर झाल्यापासून नियुक्त संस्थेने राज्यात ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये ह्या योजनेची अंमलबजावणी सुरू केली आहे, त्या त्या जिल्ह्यांसाठी त्या त्या योजने अंतर्गत सेवेसाठी नियुक्त संस्थेने सादर केलेल्या सर्व देयकांची अदायगी ही विना दंड करणे अपेक्षित आहे. मात्र कार्यपद्धती प्रकाशित झाल्यांनतर ३ महिन्यांनी, नियुक्त संस्थेने सादर केलेल्या सर्व देयकांची अदायगी ही वरील दंड रक्कमेची पडताळणी करून केली जाईल.

## तक्ता क्र. ०१ : प्राथमिक आरोग्य तपासणी टप्प्यांच्या यशस्वी अंमलबजावणीचे निकष व दंड तरतूद SLA

| Sr. No. | सेवेचा प्रकार (Services) | निकष (Parameter) | दंड (Penalty) |
|---|---|---|---|
| १ | Adherence to project timelines | Delay of ७ days in commencing the Health Check Camp from the date of approval of the Concerned Labour Officer | Rs. १०,००० per additional day of delay |
| २ | Adherence to project timelines | Non availability of the Test Reports in Online System beyond ७ working days after sample collection | Rs. १०० per additional day of delay per worker |
| ३ | Adherence to project timelines | Online System Shutdown excluding scheduled downtime of more than ४ hours | Rs. १,००० per additional day of delay per incident |

## तक्ता क्र. ०२ : उपचार पद्धती टप्प्यांच्या यशस्वी अंमलबजावणीचे निकष व दंड तरतूद SLA

| Sr. No. | सेवेचा प्रकार (Services) | निकष (Parameter) | दंड (Penalty) |
|---|---|---|---|
| १ | Commencement of "Test to Treat" treatment model in all districts of Maharashtra | Failure to commence "Test to Treat" treatment model in all districts of Maharashtra | Rs १०,००० per district per week provided there is no reason falling under force majeure definition preventing to commence "Test to Treat" treatment model in respective district. |
| २ | Providing MMU services at the nodal centre | failure to provide MMU services on the designated date of visit at the nodal centre | Rs १०,०००/- per failure provided there is no reason falling under force majeure definition preventing MMU to provide services. |
| ३ | Supply of medicines to the beneficiaries | Failure to supply medicines to all the beneficiaries within ७२ hours from the prescription by the consultant. | ०.५% per week for value of medicines not provided to the patient. |

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

| Sr. No. | सेवेचा प्रकार (Services) | निकष (Parameter) | दंड (Penalty) |
|---|---|---|---|
| ४ | Comencement of treatment | Failure to commence prescribed treatment within ७२ hours of receipt of all tests and e-preauthorization from the Construction Worker Aarogya Samiti | ०.५% per week for value of treatment not provided to the patient. |
| ५ | Empanel /Establish Hospitals and Primary Health Clinics | Failure to Empanel / Establish Hospitals and Primary Health Clinics in all districts of Maharashtra | Rs. १०,००० per additional day of delay. |
| ६ | Deployment of qualified staff | Failure to Deploy of qualified staff in all districts of Maharashtra | Rs. १०,००० per additional day of delay |
| ७ | Commencement of Software | Failure to start use of Software | Rs. १०,०००/- per week of delay |
| ८ | Commencement of Dedicated Toll Free Number | Failure to start use of Dedicated Toll Free Number | Rs. १०,०००/- per week of delay |

१७) वरीलप्रमाणे तपासणी ते उपचार आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीकरीता मे. एचएचएल लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) आणि मे. एचएससीसी (इंडिया) लिमिटेड भारत सरकार उद्योग) यांची नियुक्ती करण्यात आल्याने समन्वयाकरीता मे. एचएससीसी (इंडिया) लिमिटेड भारत सरकार उद्योग) यांची "समन्वयक" नियुक्ती करण्यात येत आहे. समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली (Dedicated Software Management System) संदर्भात कोणत्याही प्रकारच्या तांत्रीक अडचणीकरीता मे. एचएससीसी (इंडिया) लिमिटेड यांच्याशी संपर्क साधावा.

१८) मे. एचएचएल लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) आणि मे. एचएससीसी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग); या दोन नियुक्त संस्थांमध्ये मंडळ कार्यारंभ आदेश दि.२४.०७.२०२४ अन्वये कामकाज विभागणी केलेले जिल्हे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मे. एचएचएल लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) | अ.क्र. | मे. एचएससीसी (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) |
|---|---|---|---|
| ०१. | मुंबई शहर | ०१. | कोल्हापूर |
| ०२. | मुंबई उपनगर | ०२. | सांगली |
| ०३. | ठाणे | ०३. | सातारा |
| ०४. | पालघर | ०४. | सोलापूर |
| ०५. | रायगड | ०५. | पुणे |
| ०६. | रत्नागिरी | ०६. | नांदेड |

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| ०७. | सिंधुदुर्ग | ०७. | छत्रपती संभाजीनगर |
| ०८. | नाशिक | ०८. | लातूर |
| ०९. | धुळे | ०९. | बुलढाणा |
| १०. | अहमदनगर | १०. | जालना |
| ११. | जळगाव | ११. | परभणी |
| १२. | नंदुरबार | १२. | अकोला |
| १३. | वर्धा | १३. | अमरावती |
| १४. | नागपूर | १४. | हिंगोली |
| १५. | गोंदिया | १५. | वाशीम |
| १६. | गडचिरोली | १६. | यवतमाळ |
| १७. | चंद्रपूर | १७. | बीड |
| १८. | भंडारा | १८. | धाराशिव |

१९) BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रुग्णालय उभारणीव्दारे तपासणी ते उपचार आरोग्य योजना अंतर्गत मे. एचएससीसी (इंडिया) लिमिटेड या नियुक्त संस्थेकडून आरोग्य शिबीराचे आयोजन करणे, कामाच्या ठिकाणी/घरोघरी जावून आरोग्य तपासणी करणे इत्यादी करीता अनुभवी वैद्यकिय व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीच्या नियंत्रणात जिल्हा स्तरावर लाभार्थ्यांची प्राथमिक आरोग्य तपासणी करीता प्रत्येक जिल्हा बांधकाम कामगार रुग्णालयामध्ये जिल्हा व्यवसायीक आरोग्य केंद्राची आणि विभागीय स्तरावर प्रत्येक विभागीय बांधकाम कामगार रुग्णालयामध्ये विभागीय व्यवसायीक आरोग्य केंद्राची तसेच राज्यस्तरीय बांधकाम कामगार रुग्णालयामध्ये राज्यस्तरीय व्यवसायीक आरोग्य केंद्राची उभारणी करण्यात येईल.

२०) BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रुग्णालय उभारणीव्दारे तपासणी ते उपचार आरोग्य योजना अंतर्गत मे. एचएससीसी (इंडिया) लिमिटेड या नियुक्त संस्थेकडून सर्व वैद्यकिय सोईसुविधांसह NABH ने निश्चित केलेल्या गुणवत्ता निकषानुसार जिल्हास्तरावर दुय्यम काळजी दर्जाचे ५० पेक्षा जास्त खाटांच्या क्षमतेचे प्रत्येक जिल्हयामध्ये १ रुग्णालय आणि प्रत्येक विभाग स्तरावर अत्याधुनिक दर्जाचे (Multy Speciality) ७५ -१०० खाटांच्या क्षमतेचे प्रत्येक विभागामध्ये १ रुग्णालय तसेच राज्यस्तरावर अत्याधुनिक दर्जाचे (Multy Speciality) १०० पेक्षा जास्त खाटांच्या क्षमतेचे १ रुग्णालय उभारण्यात येईल.

२१) सदर योजनेमध्ये BOMT (Build Operate Manage Transfer ) या तत्वावर रुग्णालय उभारणीव्दारे तपासणी ते उपचार आरोग्य योजने अंतर्गत नमुद केलेले लाभार्थी तसेच असंघटित कामगार सुद्धा लाभार्थी राहतील. तथापि त्यांच्या खर्चाची प्रतिपुर्ती मंडळाकडून होणार नाही. त्याकरीता केंद्र / राज्य शासनाच्या अन्य योजनेतून खर्चाची प्रतिपूर्ती करुन घेण्याची जबाबदारी मे. एचएससीसी (इंडिया) लिमिटेड, या नियुक्त संस्थेची राहणार आहे.

२२) मे. एचएससीसी (इंडिया) लिमिटेड या नियुक्त संस्थेकडून सर्व वैद्यकिय सोई सुविधांसह NABH ने निश्चित केलेल्या गुणवत्ता निकषानुसार जिल्हास्तरावर दुय्यम काळजी दर्जाची ५० पेक्षा जास्त खाटांच्या क्षमतेचे प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक रुग्णालय कार्यान्वित झाल्यावर, संबधित जिल्ह्यातील "तपासणी ते उपचार" या आरोग्य सेवेची संपूर्ण अंमलबजावणीची जबाबदारी मे. एचएलएल लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांच्याकडून मे. एचएससीसी (इंडिया) लिमिटेड यांच्याकडे हस्तांतरित होईल.

**तपासणी ते उपचार या आरोग्य सेवेची अंमलबजावणी करताना लागणाऱ्या निरनिराळ्या कागदपत्रांचे नमुने. हे सर्व नमुने ऑनलाइन पोर्टल (समर्पित बांधकाम कामगार आरोग्य प्रणाली - Dedicated Software Management System) वर नियुक्त संस्थेद्वारे त्या त्या संबंधित उपचार पद्धतीसाठी अपलोड करणे आवश्यक आहे.**

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**प्रपत्र -०१**

**सामान्य संमतीपत्र**

मी --------------------------------------------------------------------------------, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार आहे. माझी व माझ्या कुटुंबातील पात्र व्यक्तींची मोफत आरोग्य तपासणी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्यातर्फे झाली आहे. या आरोग्य तपासणी चा अहवाल आम्हाला मिळाला असून, माझ्यावर व माझ्या कुटुंबातील पात्र व्यक्तींवर पुढील उपचार, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्यातर्फे सुरु करण्यात आलेल्या "तपासणी ते उपचार आरोग्य योजने" अंतर्गत करण्यासाठी माझी समंती आहे.

नोंदीत बांधकाम कामगार स्वत: लाभ घेत असल्यास तपशील:
नाव –
मोबाईल क्रमांक –
नोंदणी क्रमांक –
आधार क्रमांक –
सही -

कुटुंबातील पात्र लाभार्थी लाभ घेत असल्यास तपशील:
नाव –
नोंदीत बांधकाम कामगाराशी नाते -
सही -

प्रपत्र -२

महाराष्ट्र इमारत व इतर
बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ

विकास व कल्याण



# Health Report Card

# तपासणी ते उपचार आरोग्य योजना

फिरते वैद्यकीय कक्ष



महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ
५ वा मजला, एमएमटीसी हाऊस, प्लॉट सी-२२, ई-ब्लॉक,
वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१
Email: bocwwboardmaha@gmail.com
Website: www.mahabocw.in

अधिक माहितीसाठी टोल फ्री नंबरवर कॉल करा
**1800-2-66 66 66 66**

लाभार्थीचे नाव

नोंदणी क्रमांक

☐ स्वतः ☐ कुटुंबीय

तालुका जिल्हा

तपासणी अहवाल मिळवण्यासाठी
QR Code स्कॅन करा

## वैशिष्ठे

- निशुल्क टोल फ्री क्रमांक १८००-२-६६ ६६ ६६ ६६
- प्रत्येक जिल्ह्यामध्ये MMU (Mobile Medical Unit) म्हणजेच Advanced Life Support ने सुसज्ज असलेली मोबाइल व्हॅन (फिरते वैद्यकीय कक्ष)
- प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी - आरोग्य तपासणी शिबीर - प्रयोगशाळेतील तपासणी
- तपासणीनंतर सल्लामसलत
- प्रत्येक तालुक्यात आरोग्य क्लिनिक - मोफत OPD Consultation
- प्रत्येक जिल्ह्यात कमीतकमी ३ हॉस्पिटल - मोफत IPD (आंतररुग्ण) उपचार
- दरवर्षी मोफत औषधे
- प्रगत पुष्टीकरण आरोग्य तपासणी चाचणी (Advanced Confirmatory Test)
- अपघातप्रकरणी वैद्यकीय सहाय्य

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

## प्रपत्र -३

## स्वयं-घोषणापत्र

## (प्रगत पुष्टीकरण आरोग्य तपासणी चाचणी करण्यासाठी)

मी ------------------------------------------------------------------------, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार आहे. माझी व माझ्या कुटुंबातील पात्र व्यक्तींची मोफत आरोग्य तपासणी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्यातर्फे झाली आहे. या आरोग्य तपासणी चा अहवाल आम्हाला मिळाला असून, मला/ माझ्या कुटुंबातील पात्र व्यक्तींला पुढील प्रगत पुष्टीकरण आरोग्य तपासणी चाचणी डॉक्टरने सुचवले असून, मी/माझ्या कुटुंबातील पात्र व्यक्ति, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्यातर्फे सुरु करण्यात आलेल्या "तपासणी ते उपचार आरोग्य योजने" अंतर्गत प्रगत पुष्टीकरण आरोग्य तपासणी चाचणी करण्यासाठी माझी समंती आहे.

नोंदीत बांधकाम कामगार स्वत: लाभ घेत असल्यास तपशील:
नाव —
मोबाईल क्रमांक —
नोंदणी क्रमांक —
आधार क्रमांक —
सही -

कुटुंबातील पात्र लाभार्थी लाभ घेत असल्यास तपशील:
नाव —
नोंदीत बांधकाम कामगाराशी नाते -
सही -

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
## प्रपत्र-४
## स्वयं घोषणापत्र
## (मोफत औषधे मिळाल्यानंतर)

